**कायम विनाअनुदान तत्वावर**
**नूतनीकरणाने**

जाक्र.प्राशि-३/खाप्राशा/नू.मा./पुवि/०८-०९/2920-23
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 27 JAN 2009

प्रति
१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,पुणे

२) शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ

विषय: सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात परवानगी मिळालेल्या नविन खाजगी प्राथमिक शाळेस सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाने परवानगी देणेबाबत. . .

संदर्भ: १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राशा/१७०६/(११४/२००६)/प्राशि-३, दिनांक १६ मे २००४६
२. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. नमाशा-२००७/(९८६/०७) दिनांक १९ ऑक्टोबर २००७
३.आपले पत्र क्र. जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/४/०९. दिनांक ७/१/२००९

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ चे पत्र कृपया पहावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु नकरता सदरची शाळा सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००८ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर कायम **विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | के.विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञान प्रसारक संस्था,प्रा.विद्यालय,आंबेगाव बु.ता.हवेली,जि.पुणे | आंबेगाव बु.ता.हवेली,जि.पुणे | पहिली | मराठी | जून २००८ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादींमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ या पत्रान्वये नूतनीकरणाने शाळा परवानगी देवूनही शाळा सुरु न केल्यास भविष्यात सदर शाळेस कोणत्याही कारणास्तव नूतनीकरणाने परवानगी दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी ही संबधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

(कु-हाडे एस.जे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१ मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२ मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,--------- यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४ मा. सचिव/अध्यक्ष,
के.विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञान प्रसारक संस्था,प्रा.विद्यालय,आंबेगाव बु.ता.हवेली,जि.पुणे